सोमवार दि. २६ जानेवारी २०१६ साप्ताहिक कोकण दिनांक

# शेअर्स मार्केटसाठी आर्थिक, मानसिक बळ हवे !

## उद्योजक नाईक : हळबे महाविद्यालयात व्याख्यान

दोडामार्ग / प्रतिनिधी

शेअर्स मार्केटमध्ये जायचे असेल तर मोठ्या मानाने गेले पाहिजे. कारण या व्यवसायात कधी फायदा तर कधी तोटा सहन करावा लागतो. त्यासाठी आर्थिक व मानसिक बळ असले पाहिजे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या व्यवसायाकडे वळले पाहिजे असे प्रतिपादन उद्योजक विवेकानंद नाईक यांनी केले.

शैक्षणिक विकासाबरोबरच विद्यार्थ्यांची भावी आयुष्यात स्वत:च्या पायावर सक्षमपणे उभे राहता यावे यासाठी विद्यार्थ्यांना विविध व्यावसायिक व गुंतवणूक विषयी माहिती व्हावी या उद्देशाने येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयातील नियोजन मंचातर्फे शेअर्समध्ये गुंतवणूक कशी करावी या विषयावर तालुक्यातील उद्योजक व दोडामार्ग तालुका उत्कर्ष समितीचे अध्यक्ष श्री विवेकानंद नाईक यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांना शेअर्स मार्केटमध्ये कशी गुंतवणूक करावी, प्रत्येक माणसाला आयुष्यात मोठे व्हायचे असेल तर प्रत्येकाने भावी नियोजन कसे करावे तसेच समाजातील मोठे मोठे उद्योजक व व्यावसायिक होण्यासाठी शेअर्स मार्केटमध्ये कधी गुंतवणूक करावी. परंतु सर्व सामान्य व्यक्ती शेअर्स मार्केटबद्दल अज्ञानी असल्याने तसेच माहिती नसल्याने ते गुंतवणूक करत नाही म्हणून त्यांना लाभ मिळवता येत नाही. गुंतवणूकदारांना आयसीआयसीआय, एलआयसी, एनआयएफआय, जीआयसी इत्यादी कंपन्यामध्ये गुंतवणूक करण्यासाठी मोठा वाव आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले. व्यासपीठावर प्रा. एस. एन. खडपकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. आर. एस. इंगळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. एस. यु. दरेकर तर आभार प्रा. पी. एन. ढेपे यांनी मानले.